महाराष्ट्र वन विभाग

# जाहीरात

## मुख्य वनसंरक्षक,चंद्रपूर वनवृत्त,चंद्रपूर अंतर्गत गट-क अनुसूचित जमाती विशेष भरती मोहीम सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहीरात

**जाहीरात क्रमांक कक्ष-७(२)/आस्था/प्र.क्र./ २०१०/१९-२०** **दिनांक २० जाने.२०२०**

महाराष्ट्र शासन साप्रवि शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब मंत्रालय मुंबई दिनांक २१ डिसेंबर २०१९ अन्वये वन विभागातील अनुसूचीत जमाती प्रवर्गातील निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदामुळे रिक्त झालेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील (गट-क) पदे सरळ सेवेने भरावयाची आहेत. त्यासाठी अर्हताधारक अनुसूचीत जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक पात्र उमेदवारांकडुन विहीत नमुद अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

**अर्ज करण्याची पध्दत-**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रस्तुत परीक्षेकरीता फक्त ऑफ लाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येईल. | |
| २ | पात्र उमेदवारांनी उपवनसंरक्षक,मध्य चांदा तथा सदस्य सचिव प्रादेशिक निवड समिती यांचे नावे विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहिल. | |
| ३ | सर्व पदांकरिता ऑफलाईन अर्ज स्विकारण्याचा दिनांक जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ते दिनांक १०/०२/२०२० सायं.५.०० वाजेपर्यंत राहील. तद्नंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाही. | |

**परीक्षा शुल्क:-**

| | |
|---|---|
| अनुसूचीत जमाती उमेदवारांकरिता | रु.१५०/- |

- परिक्षा शुल्क हे **DEPUTY CONSERVATOR OF FOREST CENTRAL CHANDA DIVISION,CHANDRAPUR** यांचे नावाने चंद्रपूर शाखेला देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा मागणी धनाकर्ष (D.D.) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**१.० अनूसुचित जमाती विशेष सरळसेवा भरती २०१९ अन्वये भरावयाच्या पदांची नावे, रिक्त पद संख्या, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा एकत्रित तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रवर्ग | एकुण पदसंख्या | महिला | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षक | अनुसूचित जमाती | ०२ | -- | ०२ |
| २ | लिपिक | अनुसूचित जमाती | ०२ | ०१ | ०१ |
| ३ | वाहन चालक | अनुसूचित जमाती | ०१ | -- | ०१ |

**टिप-** १. उपरोक्त पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२. वरील अनसूचित जमातीचे ०२ सर्वेक्षक पदांमध्ये गडचिरोली वनवृत्ताचे आस्थापनेवरील १ पदाचा समावेश आहे. अंतिम निवड झालेल्या २ उमेदवारांमधून १ उमेदवाराला चंद्रपूर वनवृत्तात तर १ उमेदवाराला गडचिरोली वनवृत्ता करीता नियुक्ती आदेश दिल्या जातील.

**३. उपरोक्त पदांसाठी अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांनीच अर्ज करावे. ज्या अनुसूचित जमातीचे उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही, असे उमेदवारांनी अर्ज सादर करु नये.**

२.० वरील कोष्टकात नमुद पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षक | एस-८ २५५००-८११०० | १) उमेदवाराने किमान उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१२ वी) उत्तीर्ण केली असावी.<br>२) मान्यता प्राप्त संस्थेच्या सर्व्हेक्षक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र.<br>३) नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षात शासकीय वाणिज्य संस्थेचे मराठी टंकलेखन गती ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचे ४० शब्द प्रति मिनिट या गतीचे प्रमाणपत्र सादर करावे. |
| २ | लिपिक | एस-६ १९९००-६३२०० | १) उमेदवाराने मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी धारण केलेली असावी.<br>२) मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. |
| ३ | वाहन चालक | एस-६ १९९००-६३२०० | १) उमेदवाराने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (१० वी ) धारण केलेली असावी.<br>२) मोटार वाहन अधिनियम १९८८ ( १९८८ चा ५९) मधील तरतूदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना धारण केलेला असावा.<br>३) ज्यांनी शासकीय,निमशासकीय किंवा खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा ३ वर्षाहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव धारण केलेला असावा.<br>४) मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>५) उमेदवाराचा वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख असावा व उमेदवार चांगली शारीरिक क्षमता असलेला असावा.<br>६) उमेदवाराची दृष्टी चांगली असणे आवश्यक राहील.उमेदवार हा रातआंधळेपणा व रंग आंधळेपणा या व्याधींनी ग्रस्त नसावा.<br>७) उमेदवाराने नियुक्ती पूर्वी शारीरिकदृष्टया पात्र असल्याचे व दृष्टी चांगली असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |

३.० वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| १. | **संगणक अर्हता** ( अ.क्र.३ वरील **वाहन चालक** पदासाठी लागु नाही. ) | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/ २००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस २०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४.२.२०१३ व शासन पुरकपत्र क्रं.मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९ दिनांक ८.१.२०१८ मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे. |
| २. | **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र** | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतूदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमुद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ वा तद्नंतर जन्माला आलेल्या,अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यास पात्र होईल. |

**४.० वयोमर्यादा-** अ) सर्वेक्षक व वाहनचालक पदांसाठी उमेदवार अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेस १८ वर्षापेक्षा कमी वयाचा व ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा.

ब) लिपिक पदांसाठी उमेदवार अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेस १९ वर्षापेक्षा कमी वयाचा व ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा.

**५.० उमेदवारांना अर्ज सादर करित असतांना खालील दस्ताऐवजाच्या छायांकीत प्रती स्वसाक्षांकीत करुन जोडणे आवश्यक आहे.**

१) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
२) जात प्रमाणपत्र
३) जात वैधता प्रमाणपत्र
४) उमेदवारांचा वयाचा पुरावा
५) अधिवास प्रमाणपत्र
६) मान्यता प्राप्त संस्थेच्या सर्वेक्षक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र (सर्वेक्षक पदासाठी)
७) मराठी टंकलेखनाचे ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाचे ४० श.प्र.मि. वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र ( लिपिक पदासाठी)
८) वैध वाहन चालक परवाना (वाहन चालक पदासाठी)
९) लहान कुटुंब प्रमाणपत्र
१०) उपवनसंरक्षक,मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर यांचे नावाने देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा रु.१५०/- धनाकर्ष (D.D.)
११) प्रवेशपत्र पुर्ण भरुन फोटो लावुन
१२) विहीत नमुन्यातील अर्ज फोटो लावुन संपुर्ण भरणे आवश्यक राहील.

ऑफलाईन अर्जासोबत उपरोक्त नमुद १ ते १२ दस्ताऐवज सादर न केलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी अपात्र ठरविण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**६.० प्राप्त अर्जाची छाननी नंतर ज्या उमेदवारांचे अर्ज वैध ठरतील असे उमेदवार पुढील टप्प्यासाठी पात्र ठरतील व त्यांची लेखी परिक्षा चंद्रपूर मुख्यालयात घेण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**१)** लेखी परिक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांना उपवनसंरक्षक,मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयातुन दिनांक २२/०२/२०२० रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत प्रवेशपत्र जारी करण्यात येईल. सदर प्रवेशपत्र निवड प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर उमेदवारांना दाखवणे अनिवार्य राहील.

**२)** पात्र असलेल्या सर्व उमेदवारांची खालील प्रमाणे लेखी परिक्षा घेण्यात येईल.

**७.० वरील सर्व पदांसाठी लेखी परिक्षेचे स्वरुप**

| **अ. क्र.** | **पदाचे नाव/संवर्ग** | **मराठी** | **इंग्रजी** | **सामान्य ज्ञान** | **बौध्दिक चाचणी** | **परिक्षेचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षक | ३० | ३० | ३० | ३० | ९० मी. |
| २ | लिपिक | ५० | ५० | ५० | ५० | ९० मी. |
| ३ | वाहन चालक | ३० | ३० | ३० | ३० | ९० मी |

**८.० लेखी परिक्षेचा दर्जा/स्तर**

१) लेखी परिक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या-त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

२) ज्या पदांकरिता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे अशा पदांकरिता परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापिठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील.

३) लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

अ) सर्वेक्षक व वाहन चालक पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेत प्रत्येक प्रश्नास १ गुण ठेवण्यात येईल.

ब) लिपिक पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेत प्रत्येक प्रश्नास २ गुण ठेवण्यात येईल.

**९.० परीक्षेस प्रवेश-**

१) लेखी परिक्षेकरिता प्रवेशपत्र प्राप्त करणे व कागदपत्र पडताळणीसाठी व भरती प्रक्रीयेच्या पुढील टप्प्यासाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवाराला स्वत: करावा लागेल.

२) लेखी परिक्षा ही चंद्रपूर मुख्यालयात घेण्यात येईल.

३) प्रवेशपत्र प्राप्त करण्याच्या वेळी व परिक्षेच्या वेळी उमेदवाराने खालील पैकी एक सध्याचे वैध फोटो ओळखपत्र पुरावा म्हणून सोबत ठेवणे अनिवार्य आहे.
१) पॅन कार्ड २) पासपोर्ट ३) वाहन अनुज्ञप्ती ४) मतदार ओळखपत्र ५) आधार कार्ड

४) लेखी परिक्षेच्या वेळी फक्त पेन, परिक्षा प्रवेशपत्र,ओळखीचा पुरावा सोबत आणावे.

५) डिजीटल डायरी,पेजर,मायक्रोफोन, मोबाईल फोन,कॅमेरा अंर्तभूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड ब्लू टूथ,दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू इलेक्ट्रानिक्स उपकरणे, वहया,नोट्स, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक ( Calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परिक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परिक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील.

६) परीक्षा दालनात परीक्षेच्या वेळेपुर्वी ३० मिनिटे अगोदर हजर राहणे बंधनकारक राहील. परिक्षेवेळी इकडे-तिकडे बघणे, डोकावणे, तोतयागिरी करतांना आढळल्यास उमेदवारास परिक्षा केंद्राबाहेर पाठविण्यात येईल.

७) निवडणुक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कारणामुळे विहित दिवशी परिक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परिक्षा घेण्यात येईल.

**१०.० व्यावसायिक चाचणी:-**

१) सर्वेक्षक व वाहन चालक पदासाठी लेखी परिक्षेमध्ये किमान ४५% गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांमधून “रिक्त पदांच्या चौपट” या प्रमाणात पात्र ठरणाऱ्या उच्चतर गुणवत्ताधारक उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल.

२) सर्वेक्षक पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी लेखी परिक्षेमध्ये किमान ४५% गुण प्राप्त केले आहे,अशा उमेदवारांची ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. व्यावसायिक चाचणीमध्ये GPS संचाच्या सहाय्याने Polygon तयार करणे, प्लेन टेबल सर्वे, चेन सर्वे, नकाशा बनविणे, सर्वेक्षण व सिमांकन करणे इ. विषयाबाबत व्यावसायिक चाचणी करण्यात येणार आहे.

३) वाहन चालक पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी लेखी परिक्षेमध्ये किमान ४५% गुण प्राप्त केले आहे,अशा उमेदवारांची ८० गुणांची वाहन चालवण्याची चाचणी घेण्यात येईल.

**११.० लेखी परिक्षेव्दारे व व्यावसायिक परिक्षेनंतर निवडीची कार्यपध्दती-**

१) लिपिक पदाकरिता घेण्यात आलेल्या २०० गुणांच्या लेखी परिक्षेमध्ये किमान ४५% गुण प्राप्त उमेदवारांची गुणांचे आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

२) सर्वेक्षक व वाहन चालक पदासाठी लेखी परिक्षेमध्ये ४५% गुण प्राप्त उमेदवारांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात येईल व त्यांची ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. लेखी परिक्षेचे गुण व व्यावसायिक चाचणीचे गुण एकत्रित करुन अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

**१२.० महत्वाच्या सुचना-**

१) उमेदवारांना प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल.प्रत्येक अर्जासोबत १५० रु. चा डी.डी. जोडणे बंधनकारक राहील.

२) उमेदवाराने भरणा केलेले परिक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये परत केले जाणार नाही.

३) उमेदवारांची निवड होवुन नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परिक्षा, विभागीय परिक्षा आणि इतर परिक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवेळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादि कारवाई केली जाईल.

४) निवड प्रक्रीया सरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात नमुद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड/नेमणुक रद्द करण्यात येईल.

५) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अनियो/१०/०५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार दिनांक ०१/११/२००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारांचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील. त्यांना सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तीत्वात असलेली महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम लागू होणार नाही.

६) महिला उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या-त्या सामाजिक प्रवर्गातून सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार होवु शकेल.

७) ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे,सेवा योजन कार्यालय,समाजकल्याण,आदिवासी विकास प्रकल्प, अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नावे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

**ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा पत्ता-**

**उपवनसंरक्षक,मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर यांचे कार्यालय**
**मुल रोड,माता मंदिर समोर,चंद्रपूर-442401**
**दुरध्वनी क्रमांक (07172) 253508**

**दिनांक :- 24/01/2020**

**ठिकाण:- चंद्रपूर**

**स्वा/-**

**अध्यक्ष,प्रादेशिक निवड समिती तथा**
**मुख्य वनसंरक्षक,चंद्रपूर वनवृत्त,चंद्रपूर**

## मुख्य वनसंरक्षक,चंद्रपूर वनवृत्त,चंद्रपूर अंतर्गत गट-क अनुसूचित जमाती विशेष भरती मोहीम सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहीरात सन २०२०

## अर्जाचा विहीत नमुना

**अर्जाचा कार्यालयीन क्रमांक - ....**

**प्राप्त दिनांक - / / २०२०**

| उमेदवाराचा अलीकडे काढलेला फोटो |
|---|

**प्रति,**

**मा.उपवनसंरक्षक,**
**मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर**
**तथा सदस्य सचिव,प्रादेशिक निवड समिती,**
**चंद्रपूर-४४२४०१**

**विषय-विशेष भरती मोहिमेअंतर्ग अनुसूचित जमाती या प्रवर्गात राखीव असलेल्या------------------------ या पदाकरिता अर्ज सन २०२०**

वनविभागाचे संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली विस्तृत जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असून जाहिरातीचे अनुषंगाने माझ्या जातीचा प्रवर्ग हा अनुसूचित जमाती असून मी,--------------------------------या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. सदर पदाकरिता आवश्यक असलेली माहिती खालील प्रमाणे असून मी सदर अर्जासह विस्तृत जाहिरातीनूसार अनिवार्य दस्ताऐवजाच्या स्वक्षांकीत छायाप्रती सोबत जोडल्या आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | उमेदवाराचे पूर्ण नांव | आडनांव | स्वत:चे नाव | वडिलांचे नाव |
| | मराठीमध्ये | | | |
| | ( In Capital Letter) इंग्रजीमध्ये | | | |
| २. | लिंग (पुरुष/महिला ) | | | |
| ३. | विवाहीत/अविवाहीत | | | |
| ४. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड क्रमांकासह) | | | |
| | दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक | | | |
| | ई-मेल आय.डी. (असल्यास) | | | |
| ५. | जात/जातीचा प्रवर्ग | जातीचा प्रवर्ग- | जात- | |
| ६. | जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | | | |
| ७. | जन्म तारीख ( अंकात) | दिनांक | महिना | वर्ष |
| | | | | |
| ८. | दिनांक १०/०२/२०२० रोजीचे वय | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | |
| ९. | जन्म ठिकाण | गांव | तालुका | जिल्हा |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | राष्ट्रीयकृत बँकेचे नाव व शाखा | धनाकर्ष क्रं. (D.D.) | दिनांक | रक्कम |
| | | | | |

| ११. | **शैक्षणिक अर्हता** | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र | शैक्षणिक पात्रता | संस्थेचे/मंडळाचे नाव | प्राप्त गुणांची टक्केवारी | परीक्षा उत्तीर्ण वर्ष |
| १ | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (वाहन चालक पदासाठी) | | | |
| २ | उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (सर्वेक्षक पदासाठी) | | | |
| ३ | पदवी परिक्षा (लिपिक पदासाठी) | | | |
| ४ | मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. (लिपिक पदासाठी ) | | | |
| ५ | इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. (लिपिक पदासाठी) | | | |
| ६ | सर्वेक्षक प्रमाणपत्र (सर्वेक्षक पदासाठी) | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२. | वाहन चालक पदासाठी वाहन चालविण्याचा परवाना | परवाना क्रमांक | दिनांक | वैधता दिनांक | प्रकार |
| | | | | | |
| १३. | वाहन चालक पदासाठी अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले आहे /नाही | | | | |

मी असे प्रमाणित करतो/करते की, वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून नमुद केलेली माहिती चुकीची व खोटी आढळून आल्यास माझी या पदाकरिता उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील. व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ-

दिनांक

उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे पुर्ण नाव:---------------------------------

**महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ प्रतिज्ञापत्र**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना-अ**

**(नियम ४ पहा )**

मी श्री/श्रीमती/कुमारी---------------------------------------------------------------------------

श्री--------------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय--------------वर्ष रा.------------याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी---------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला--------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या------------आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावे.)

३) हयात आलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल. यांची मला जाणीव आहे.

ठिकाण-

दिनांक- / /२०२० अर्जदाराची सही

अर्जदाराचे संपूर्ण नाव-----------------------------------

**मुख्य वनसंरक्षक,चंद्रपूर वनवृत्त,चंद्रपूर अंतर्गत गट-क अनुसूचित जमाती विशेष भरती मोहीम अंतर्गत सर्वेक्षक/लिपिक/ वाहन चालक पदासाठी भरती प्रक्रिया सन २०२०**

**प्रवेशपत्र**

| **आय.डी.क्रमांक** | | उमेदवार यांनी रकान्यात पासपोर्ट आकाराचे फोटो चिपकवावे |
|---|---|---|

**उमेदवाराचे संपूर्ण नाव:------------------------------------------------------------------**

**पदाचे नांव :------------------------------------------------------------------**

**उमेदवारांची स्वाक्षरी** **प्राधिकृत अधिकारी**

**सदर प्रवेशपत्र भरती प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सादर केलेशिवाय भरती प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही.**

## सरळसेवा भरती प्रक्रियेचा कार्यक्रम

### संवर्ग-सर्वेक्षक/वाहन चालक

| अ.क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १. | जाहिरात प्रसिध्द करणे | २५-०१-२०२० |
| २. | ऑफलाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.१०-०२-२०२० सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ३. | अर्जाची छाननी करुन पुढील फेरीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रकाशित करणे. | दि.१५-०२-२०२० |
| ४. | लेखी परिक्षेसाठी प्रवेशपत्र प्राप्त करण्याचा दिनांक | दि.२२-०२-२०२० सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० |
| ५. | ऑफलाईन पध्दतीने लेखी परिक्षा | दि.२३-०२-२०२० |
| ६. | लेखी परिक्षेच्या अनुषंगाने आदर्श उत्तरपत्रिका वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | दि.२४-०२-२०२० सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ७. | आदर्श उत्तरपत्रिकेच्या अनुषंगाने चुकीच्या छाप प्रश्नाविरुध्द आक्षेप(असल्यास ) प्राप्त करणे | दि.२६-०२-२०२० सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ८. | लेखी परिक्षेचा निकाल वेबसाईटवर जाहीर करणे. | दि.०७-०३-२०२० |
| ९. | पुढील फेरीसाठी लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त केले आहे अशा पात्र उमेदवारांची यादी वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | दि.०७-०३-२०२० |
| १०. | कागदपत्रे तपासणे | दि.११-०३-२०२० दु.१२.०० ते ५.०० वाजेपर्यंत |
| ११. | व्यावसायिक चाचणी | दि.१२-०३-२०२० |
| १२. | लेखी परिक्षेतील व व्यावसायिक चाचणीतील गुण मिळून निवड यादी व प्रतिक्षा यादी वेबसाईटवर जाहिर करणे. | दि.१८-०३-२०२० सायं.७.०० वाजेपर्यंत |
| १३. | अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | दि.१९-०३-२०२० |
| १४. | नियुक्तीचे आदेश निर्गमित करणे | दि.२७-०३-२०२० |

**टिप-**वरील वेळापत्रकाप्रमाणे स्थळ व वेळ www.mahaforest.gov.in संकेत -स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

## सरळसेवा भरती प्रक्रियेचा कार्यक्रम

**संवर्ग-लिपिक**

| अ.क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १. | जाहिरात प्रसिध्द करणे | २५-०१-२०२० |
| २. | ऑफलाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.१०-०२-२०२० सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ३. | अर्जाची छाननी करुन पुढील फेरीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रकाशित करणे. | दि.१५-०२-२०२० |
| ४. | लेखी परिक्षेसाठी प्रवेशपत्र प्राप्त करण्याचा दिनांक | दि.२२-०२-२०२० सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० |
| ५. | ऑफलाईन पध्दतीने लेखी परिक्षा | दि.२३-०२-२०२० |
| ६. | लेखी परिक्षेच्या अनुषंगाने आदर्श उत्तरपत्रिका वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | दि.२४-०२-२०२० सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ७. | आदर्श उत्तरपत्रिकेच्या अनुषंगाने चुकीच्या छाप प्रश्नाविरुध्द आक्षेप(असल्यास ) प्राप्त करणे | दि.२६-०२-२०२० सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ८. | लेखी परिक्षेचा निकाल वेबसाईटवर जाहीर करणे. | दि.०७-०३-२०२० |
| ९. | पुढील फेरीसाठी लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त केले आहे अशा पात्र उमेदवारांची यादी वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | दि.०७-०३-२०२० |
| १०. | कागदपत्रे तपासणे | दि.११-०३-२०२० दु.१२.०० ते ५.०० वाजेपर्यंत |
| ११. | लेखी परिक्षेतील गुणांचे आधारे अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी वेबसाईटवर जाहिर करणे. | दि.१२-०३-२०२० |
| १२. | नियुक्तीचे आदेश निर्गमित करणे | दि.२०-०३-२०२० |

**टिप-**वरील वेळापत्रकाप्रमाणे स्थळ व वेळ www.mahaforest.gov.in संकेत -स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.